# कोकणातून २,१३९ एसटी मुंबईला पोहोचल्या!

## टप्प्या-टप्प्याने बसेस रवाना, रत्नागिरी विभागाच्या नियोजनामुळे चाकरमान्यांचा सुखकर प्रवास

**रत्नागिरी: पुढारी वृत्तसेवा**

गणेशोत्सवानंतर चाकरमान्यांचा परतीचा प्रवास चांगला, सुखकर व्हावा म्हणून रत्नागिरी विभागाच्या वतीने जादा एसटी बसेस सोडण्यात आले. परतीच्या प्रवासासाठी २ हजार १३९ एसटी बसेसचे आरक्षण झाले होते. २ ते ७ सप्टेंबरच्या काळात टप्प्या टप्प्याने एसटी बसेस सोडण्यात आले. शेवटच्या दिवशी तब्बल ५६ एसटी बसेस मुंबईला रवाना झाल्या. एसटी चांगल्या सुविधा, नियोजनामुळे चाकरमान्यांचा मुंबई, पुण्याचा प्रवास सुखकर, चांगला झाला.परतीच्या प्रवासाठी जादा गाड्या सोडणाऱ्या रत्नागिरी विभागास लाडका बाप्पा पावणार असून कोट्यावधीची उत्पन्न विभागास होण्याची शक्यता आहे.

गणेशोत्सवासाठी प्रत्येक



कोकणकर आपल्या मुळगावी जात असल्यामुळे एसटी महामंडळाच्या वतीने गणेशोत्सवासाठी ५ हजार २०० एसटी बसेस कोकणात सोडल्या होत्या. त्यापैकी २९३० एसटी बसेस रत्नागिरी जिल्ह्यात आल्या होत्या.तर रत्नागिरी विभागाच्या एकुण २०० एसटी बसेस मुंबईला गेल्या होत्या. गणेशोत्सवात दहा दिवसात चाकरमान्यांनी गणेशोत्सवाचा सण आनंदात साजरा केला.

**आगारनिहाय मुंबईला गेलेल्या एसटी बसेस**

| आगार | संख्या |
|---|---|
| दापोली | १९५ |
| खेड | ३२६ |
| चिपळुण | २६६ |
| गुहागर | ३७५ |
| देवरूख | ३१० |
| रत्नागिरी | १८८ |
| लांजा | १६८ |
| राजापूर | १९३ |
| मंडणगड | ११८ |
| **एकुण** | **२१,१३९** |

गौरी-गणपतीच्या विसर्जनानंतर खऱ्या अर्थाने चाकरमान्याना मुंबईलसह अन्य शहरात जाण्यासाठी वेध लागले होते. चाकरमान्यांचा प्रवास चांगला होण्यासाठी रत्नागिरी विभागाने २ हजार ५०० एसटी बसेसचे नियोजन करण्यात आले होते. त्यापैकी २१३९ एसटी बसेसचे आरक्षण झाले होते. २ ते ७ सप्टेंबरच्या कालावधीत या एसटी बसेस रत्नागिरी जिल्ह्यातील त्या त्या आगारातून मुंबईत पोहोचल्या आहेत.

मुंबईकरांचा परतीचा प्रवास आनंदमयी होण्यासाठी रत्नागिरी विभागातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतल्यामुळे, चोख नियोजन केल्यामुळेच सर्व कोकणवासीयांचा मुंबईचा प्रवास सुखकर झाला.तसेच काहीजणांनी रेल्वे, खासगी बसेस, चारचाकीचा आधार घेवून मुंबईचा प्रवास केला.

> “ रत्नागिरी विभागातून परतीच्या प्रवासासाठी २ हजार १३९ एसटी बसेसचे बुकींग झाले होते. सर्वच एसटी बसेस मुंबईत पोहोचल्या आहेत. कोकणवासीयांचा प्रवास चांगला होण्यासाठी एसटी विभागाच्या प्रत्येक, कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली होती.
>
> **प्रज्ञेश बोरसे,**
> विभाग नियंत्रक

### कोकण झाले सामसूम

गणेशोत्सवानिमित्त लाखो चाकरमानी आपल्या कोकणातील मूळ गावी परतले होते. त्यामुळे वर्षभरबंद असलेली दारे उघडली. १० दिवसात लाडक्या बाप्पाची मनोभावे पूजा केली. सर्व कुटूंब एकत्रित आले होते. गणेशोत्सवानंतर आता चाकरमानी मुंबईला परतू लागले असून ६ तारखेपर्यंत कित्येक प्रवासी मुंबईला पोहोचले तर रविवारी शेवटची एसटी मुंबईला रवाना झाली.दहा दिवसात गजबजले कोकण आता सामसूम झाले आहे. परतीचा प्रवास करताना चाकरमान्यांच्या व त्यांच्या कुटूंबियाच्या डोळ्यातून आश्रु दिसून आले.

# कोकणात पावसाने घेतली विश्रांती

## आता १० सप्टेंबरपर्यंत रत्नागिरीस कोणताच अलर्टचा इशारा नाही!

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

कोकणातील रत्नागिरी जिल्ह्यात मागील दोन दिवसापासून पावसाने विश्रांती घेतली होती. काही तालुक्यात तुरळक पाऊस झाला. कित्येक दिवसानंतर सूर्यनारायणाचे दर्शन झाले आहे. ६ सप्टेंबरपर्यंत जिल्ह्याला यलो अलर्ट होते. मात्र आता १० सप्टेंबरपर्यंत रत्नागिरीला कोणताही अलर्ट दिलेला नाही. सोमवारी सरासरी ६.२१ मि.मी पावसाची नोंद झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यात कधी ढगाळ वातावरण तर कधी कडक उन्ह पडत असून काहीप्रमाणात उकाडा जाणवत आहे.

ऑगस्ट महिन्यात पावसाने दमदार हजेरी लावली होती. लाडक्या बाप्पाच्या आगमनाबरोबरच पावसाने कमबॅक केले होते. गणेशोत्सवाच्या काळात पावसाने हजेरी लावली त्यामुळे कित्येक चाकरमान्यांना घराबाहेर पडू दिले नाही. लाडक्या बाप्पाच्या विसर्जनादिवशी पावसाने हजेरी लावली. गणेशभक्त भरपावसात भिजत गणरायाला निरोप दिला.

### जिल्ह्यात आतापर्यंत १०० टक्के पाऊस

रत्नागिरी जिल्ह्यात १ जून ते ७ सप्टेंबरपर्यंत तब्बल ३० हजार २६६ मि.मी. इतका म्हणजेच १०० टक्के पाऊस झाला आहे. खेड १११.१२ टक्के, गुहागर १०० टक्के, चिपळुण १०७ टक्के, राजापूर १०६ टक्के असे चार तालुक्यात १०० टक्क्यांहुन अधिक पाऊस पडला आहे.उर्वरित तालुक्यात ९८ ते ९९ टक्क्यापर्यंत पाऊस झाला आहे.मागील वर्षी सर्वच तालुक्यात शंभर टक्क्यांहून अधिक पाऊस झाला होता.

### रत्नागिरी वगळता या जिल्ह्यांना यल्लो अलर्ट

रत्नागिरी जिल्ह्याला १० सप्टेंबरपर्यंत कोणताही इशारा दिला नाही.रत्नागिरी वगळता अमरावती, यवतमाळ, वर्धा, नागपूर, चंद्रपूर, भंडारा, गोंदिया, गडचिरोली या जिल्ह्यांना ८ आणि ९ सप्टेंबर रोजी यल्लो अलर्ट तर १० सप्टेंबर रोजी हिंगोली, नांदेड जिल्ह्यास यल्लो अलर्ट देण्यात आला आहे.


**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

सार्व.बांधकाम विभाग

निविदा सुचना

ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील “ आमदार स्थानिक विकास कार्यक्रम (आमदार निधी)” या लेखाशिर्षकाअंतर्गत १) कळवा-मुंब्रा विधानसभा क्षेत्रातील १४९ मध्ये किस्मत कॉलनी परिसरात गटार, पायवाट विविध ठिकाणी चेंबर कव्हर बसविणे व कॉंक्रिटीकरण करणे. २) कळवा - मुंब्रा विधानसभा क्षेत्रातील प्रभाग १४९ मध्ये राहत अपार्टमेंट लगत गटार व पायवाट तयार करणे. या दोन कामाकरिता ऑनलाईन निविदा मागविण्यात येत आहेत. ज्या कंत्राटदारांविरुध्द शासकीय निमशासकीय/ सार्वजनिक क्षेत्रातील संस्था व उपक्रम स्थानिक / स्वराज्य संस्था इ. यांनी शिस्तभंगाचे कार्यवाहिच्या अनुषंगाने नोंदणीपत्र रद्द करण्याची कार्यवाही केली / सुरु आहे, अशा कंत्राटदारांना निविदा प्रक्रियेत भाग घेता येणार नाही. निविदा सुचना ठाणे महानगरपालिकेचे संकेतस्थळ https:://mahatenders.gov.in वर दि. ०८/०९/२०२५ ते दि. १५/०९/२०२५ पर्यंत उपलब्ध आहे. दि. १५/०९/२०२५ रोजी पर्यंत सायं. १६.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील. निविदा दि. १६/०९/२०२५ सायं. १६.०० वाजता निविदाकार अथवा त्यांचे प्रतिनिधी समक्ष उघडण्यात येतील.

ठामपा/पिआरओ/सा.बा मुं. प्र.स /६०७/२०२५-२६
दि.०४.०९.२०२५

सही/-
कार्यकारी अभियंता
ठाणे महानगरपालिका, ठाणे.

Pls visit our oficial web-site
www.thanecity.gov.in


# कसाल-मालवण रस्त्यावरील अपघातात स्कूटरस्वार जागीच ठार

## संतप्त नागरिकांनी मार्ग रोखला

**ओरोस : पुढारी वृत्तसेवा**

कसाल- मालवण हमरस्त्यावर रानबाबुळी तिठ्यापुढील वळणावर लक्झरी आणि मोटरसायकल यांच्यात धडक होऊन झालेल्या झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वार गणेश चंद्रकांत घोगळे (२९)हा जागीच ठार झाला. तर मोटर सायकलवर मागे बसलेली महिला किरकोळ जखमी झाली.दरम्यान या अपघातानंतर घटनास्थळी परिसरातील नागरिकांनी तब्बल तीन साडेतीन तास मार्ग रोखून धरला. त्यामुळे मार्गावर मोठी वाहतूक कोंडी झाली.

पोलिसांनी मध्यस्थी केल्यानंतर साडेतीन तासानंतर मृतदेह ताब्यात घेण्यात आला. मृताचे नातेवाईकही घटनास्थळी दाखल झाले आणि त्यांनी



आक्षेप घेतला त्यामुळे घटनास्थळावर काहीसे वातावरण तंग झाले होते. अपघाताचे हे वृत्त कळताच ओरोस पोलिसांनी अपघात स्थळी धाव घेतली. रविवारी दु. ३.३० वा. च्या सुमारास हा अपघात झाला.

गणेश घोगळे हा पडवे मेडिकल कॉलेजमध्ये कामाला आहे. तो काम संपवुन दुपारी आपल्या दुचाकीने घरी वराड येथे जात होता. त्याच्या सोबत कामावर असलेली एक महिला कर्मचाऱ्याला त्याने दुचाकीवर लिफ्ट दिली होती. गणेश घोगळे हा रानबांबुळी येथील वळणावर आला असता मालवणकडून येणाऱ्या लक्झरी बसची व त्याच्या दुचाकीची समोरसमोर जोरदार धडक झाली. यात स्वार गणेश घोगळे यांच्या डोकीला जबर मार लागल्याने तो जागीच गतप्राण झाला.

## दोन अपघातात दोन दुचाकीस्वारांचा मृत्यू

**ओरोस : पुढारी वृत्तसेवा**

रविवारी जिल्ह्यात दोन्ही ठिकाणी झालेल्या भिषण अपघातांमध्ये दोन मोटरसायकलस्वारांचा जागीच मृत्यू झाला. कसाल- मालवण हमरस्त्यावर रानबांबुळी तिठ्यापुढील वळणावर लक्झरी आणि मोटरसायकल यांच्यात धडक होऊन झालेल्या झालेल्या अपघातात मोटरसायकलस्वार गणेश चंद्रकांत घोगळे (२९,) हा जागीच ठार झाला. तर त्याच्या सोबत असलेली महिला जखमी झाली. तर तिलारी-शेटवेवाडी येथे दुचाकी व पिकअन यांच्या धडक होऊन झालेल्या अपघातात राहुल दिलीप वरक (रा. कुंब्रल - धनगरवाडी यांचा जागीच मृत्यू झाला तर याच्यासोबत असलेला विठ्ठल देऊ घारे (१९) हा गंभीर जखमी झाला.

# तिलारी येथे दुचाकी व टेम्पोची धडक; एक ठार; एक गंभीर

**दोडामार्ग : पुढारी वृत्तसेवा**

तिलारी येथे पर्यटनाच आस्वाद घेऊन परतणाऱ्या १९ वर्षीय युवकावर काळाने घाला घातला. राहुल दिलीप वरक (रा. कुंब्रल -धनगरवाडी) असे त्याचे नाव आहे. तिलारी- शेटवेवाडी येथे त्याच्या दुचाकीची व टेम्पोची समोरासमोर धडक बसून झालेल्या भीषण अपघातात ही दुर्दैवी घटना घडली. त्याच्यासोबत असलेला विठ्ठल देऊ घारे (१९) हा गंभीर जखमी झाला असून त्याला पुढील उपचारासाठी बांबोळी येथे पाठविण्यात आले. रविवारी संध्याकाळी ४ वा.च्या सुमारास घडली.

कुंब्रल येथील पाच युवक दुचाकी घेऊन रविवारी सकाळी तिलारी धरण परिसरात पर्यटनासाठी गेले होते. दिवसभर त्याठिकाणी मौज मजा करून सायं. ४ वा. च्या सुमारास ते घरी परतत होते. घरी परतत असताना तिलारी- शेटवेवाडी येथील वळणावर दुचाकी वरील ताबा सुटल्याने समोरुन येणाऱ्या पीकअप टेम्पोला दुचाकीची धडक झाली. ही धडक इतकी मोठी होती की, दुचाकीवरील एकाचा जागीच मृत्यु झाला. तर चालक विठ्ठल घारे हा गंभीर जखमी झाला. अपघात घडताच जोरात झालेल्या आवाजामुळे ग्रामस्थांनी घटनास्थळी धाव घेतली. दोघेही दुचाकीस्वार रस्त्यावर पडलेले होते. अपघातामुळे रस्त्याच्या दोन्हीं बाजूला वाहतूक खोळंबली होती. पोलिसांना अपघाताची माहिती देण्यात आली. तसेच रुग्णवाहिका पाचारण करण्यात आली. अपघातग्रस्त दोघांनाही रुग्णवाहिकेने दोडामार्ग येथे रुग्णालयात नेण्यात आले. त्यानंतर वाहतूक कोंडी दूर करून रस्ता वाहतुकीस सुरळीत करण्यात आला.

अपघाताची माहिती नातेवाईकांना कळताच नातेवाईकांनी रुग्णालयात धाव घेतली. वैद्यकीय अधिकाऱ्यांनी राहुल वरक याला मृत घोषित केले. तर विठ्ठल देऊ घारे याच्या डोक्याला जबर मार लागल्याने त्याला पुढील उपचारासाठी बांबोळी गोवा येथे पाठविण्यात आले. मयत राहुल वरक याच्या पश्चात वडील, आई व बहीण असा परिवार आहे.

## संक्षिप्त

### जिल्ह्यात गणेशोत्सवाची जल्लोषी सांगता

**ओरोस/ कणकवली :** गणपती बाप्पा मोरया...मंगलमूर्ती मोरया..पुढच्या वर्षी लवकर या...गणपती चालले गावाला...चैन पडेना आम्हाला...एक दोन तीन चार...गणपतीचा जयजयकार...असा जयघोष अन् ढोल-तशांचा गजर, जडअं:तकरणाने लाडक्या गणरायाला शनिवारी अनंत चर्तुदशीदिनी निरोप देण्यात आला. या विसर्जन सोहळ्याने जिल्ह्याच्या महाउत्सवाची म्हणजेच गणेशोत्सवाची सांगता झाली. अजूनही जिल्ह्यात काही ठिकाणी १५, १७, २१, ३९, ४२ असे सार्वजनिक व घरगुती गणेशमूर्तींचे पूजन होत आहे.मात्र ११ दिवसांच्या गणेशमूर्ती विर्सजन सोहळ्याने खऱ्या अर्थाने गणेशोत्सवाची सांगता झाल्याचे मानले जाते. जिल्ह्यात शनिवारी जिल्हाभरात मिळून १८ हजार १० खाजगी तर १७ सार्वजनिक गणेशमूर्तींचे भक्तिमय वातावरणात व ढोल ताशाच्या गजरात, फटाक्यांच्या आत नदी, नाले, ओढे, तलाव, खाडी आदी विसर्जन स्थळी लाडक्या बापाला निरोप देताना भाविकांचा कंठ दाटून आला होता. कोकणासह सिंधुदुर्ग जिल्ह्यात २७ ऑगस्ट रोजी गणेशोत्सवाला सुरुवात झाल. त्यानंतर दीड दिवस, पाचव्या व सातव्या दिवशीही जिल्ह्यात गणेश मूर्तींचे विसर्जन करण्यात आले. शनिवारी सायं. ४ वा. पासूनच गावागावातील गणेशघाटांवर विर्सजनासाठी भाविकांची गर्दी झाली होती. रात्री उशिरापर्यंत हे मूर्ती विर्सजन सुरू होते. काही गणेश भक्तांनी डोक्यावर तर काहींनी सजवलेल्या वाहनांमधून मिरवणुकींमधून गणेशमूर्ती विर्सजनस्थळी नेल्या. ‘गणपती बाप्पा मोरया... पुढच्या वर्षी लवकर या...च्या घोषणां’ आणि फटाक्यांच्या आतषबाजीनी विर्सजन परिसर दणाणून गेले होते. ‘निरोप घेतो देवा आता आज्ञा असावी, असे बोल गणेशभक्तांच्या मुखी होते.

### कोकण रेल्वे मार्गावर २५ सप्टेंबरपासून विशेष ट्रेन

दसरा-दिवाळी सणाचे औचित्य साधून मध्य रेल्वेने लोकमान्य टिळक टर्मिनस ते तिरुवनंतपुरम अशी कोकण रेल्वे मार्गे धावणारी २० विशेष साप्ताहिक सेवा जाहीर केल्या आहेत. या विशेष गाड्यांमुळे गणेशोत्सव, दसरा आणि दिवाळीदरम्यान कोकण आणि केरळला जाणाऱ्या प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे. या बाबत रेल्वेने दिलेल्या माहितीनुसार गाडी क्रमांक ०१४६३ ही लोकमान्य टिळक टर्मिनस ते तिरुवनंतपुरम उत्तर अशी धावणार आहे. दर गुरुवारी सायंकाळी ४ वाजता लो. टिळक टर्मिनस येथून सुटून दुसऱ्या दिवशी यात्री ८ वाजून ४५ मिनिटांनी वाजता तिरुवनंतपुरम उत्तर येथे पोहोचेल. या गाडीच्या २५ सप्टेंबर २०२५ ते २७ नोव्हेंबर २०२५ पर्यंत. एकूण १० सेवा होणार आहेत. याचबरोबर उलट दिशेच्या फेरीत गाडी क्रमांक ०१४६४ तिरुवनंतपुरम उत्तर ते लोकमान्य टिळक टर्मिनस ही गाडी दर शनिवारी सायंकाळी ४ वा. २० मिनिटांनी वाजता तिरुवनंतपुरम उत्तर येथून सुटून दुसऱ्या दिवशी रात्री ९ वाजून ५० मिनिटांनी लोकमान्य टिळक टर्मिनस येथे पोहोचेल. ही गाडी २७ सप्टेंबर २०२५ ते २९ नोव्हेंबर २०२५ पर्यंत. एकूण १० फेऱ्या करणार आहे.या विशेष गाडीला कोकण आणि दक्षिणेकडील अनेक महत्त्वाच्या स्थानकांवर थांबा आहे. त्यामुळे अनेक प्रवाशांना याचा फायदा होईल. यात ठाणे, पनवेल, चिपळूण, रत्नागिरी, कणकवली, सावंतवाडी रोड, मडगाव, कारवार, मंगळुरु, कासारगोड, कन्ननोर, कालीकट, एर्नाकुलम टाउन आणि कोल्लम या प्रमुख स्थानकांचा समावेश आहे.

### संगमेश्वर-डिंगणी रस्त्याची चाळण

**देवरुख :** संगमेश्वर डिंगणी रस्ता पूर्णपणे खड्डेमय झाला आहे. हा रस्ता महत्त्वाचा आहे. संगमेश्वर डिंगणी या खाडीपट्टयातील रस्त्यावरून १५ गावातील लोक प्रवास करतात. जवळचा रस्ता असल्याने गणपतीपुळ्याकडे जाणारे भक्तगण या रस्त्यानेच जातात. याची दुरुस्ती व्हावी अशी मागणी होत आहे. या रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडलेले आहेत. दोन्ही बाजूंच्या साईडपट्ट्यावर चिखलाचे कमालीचे साम्राज्य आहे. त्यात भर म्हणून सीएनजी ची अवजड वाहने दोन्ही बाजूंना उभी करून ठेवलेली असतात. त्यांनी तर चिखलच होत आहे. रस्त्यावरून गाडी चालवणे अवघड झाले आहे. सगळ्या रस्त्यावर चिखल. सगळीकडे खड्डेच खड्डे. खड्ड्यामध्ये गाडीचे चाक पूर्ण बुडते. रस्त्यावरून प्रवास करताना जणू काय आपण होडीतच बसलो आहे असे वाटते या रस्त्यावरून वाहनाने किंवा पायी जाणे म्हणजे अपघाताला आमंत्रणच आहे. पायी चालत जायला साइट पट्टीच राहिलेली नाही. जीव मुठीत धरून प्रवास करावा लागतो. सार्वजनिक बांधकाम विभागाने, लोकप्रतिनिधी, गावपातळीवर असणारे त्याचे कार्यकर्ते यांनी लक्ष देऊन रस्त्याची दुरुस्ती लवकरात लवकर करावी. सीएनजी अवजड वाहनांची पार्किंग व्यवस्था अन्य कुठेतरी करावी, अशी मागणी होत आहे.

### चुकीच्या शैक्षणिक धोरणाविरोधी संघटीत संघर्षाची गरज : आयरे

**पाचल :** ग्रामीण भागात लहान मोठे उद्योग व्यवसाय नाहीत. तसेच रोजगाराची संधी उपलब्ध नसल्याने तरुणवर्ग मोठ्या प्रमाणात शहरात स्थलांतरित झाला आहे. त्यामुळे कोकणातील ८० टक्के घरे आज बंद आवस्थेत आहेत. या सर्वांचा परिणाम शाळेच्या पटसंख्येवर झाला आहे. शासनाने पटसंख्येअभावी शाळा बंद करण्याचा निर्णय घेतला असून काही शाळा बंददेखील केल्या आहेत. शासनाचे हे धोरण चुकीचे असून गोरगरीब शेतकऱ्यांच्या मुलांवर अन्याय करणारे आहे. या चुकीच्या शैक्षणिक धोरणाविरोधात संस्थाचालक, शिक्षक, पालक या सर्वांनी संघटित होऊन संघर्ष करण्याची गरज असल्याचे स्पष्ट मत जामदा खोरे शिक्षण प्रसारक मंडळ मिळंद संस्थेचे अध्यक्ष सुहास आयरे यांनी केले. मिळंद येथील आत्माराम आयरे विद्यालयात आयोजित कै. आत्माराम आयरे यांचा ५३ वा स्मृतिदिन आणि विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमात ते बोलत होते. याप्रसंगी स्पर्धा परीक्षेत तसेच पाचवी ते दहावीतील प्रथम तीन क्रमांकाच्या विद्यार्थ्यांचा प्रमाणपत्र व भेटवस्तू देऊन सन्मान केला.

# दापोली पर्यटनात रंगीबेरंगी रानफुलांचा बहर

## पावसाळ्यात निसर्ग सजला; अनेक फुलांना गणेश पूजेत मान

**दापोली: प्रवीण शिंदे**

दापोलीच्या पर्यटन वैभवात अधिक भर घालत आहेत ती रानमाळावर फुललेली रंगीबेरंगी फुले, या रंगीबेरंगी रानफुलांनी दापोलीच्या निसर्गाचे रूप जणू सजले आहे. असं म्हणतात कोकणचे रूपे हे पावसाळ्यातच बघावे. पावसाळ्यात रानमाळावर फुललेल्या अनेक फुलांना गणेश पूजेत विशेष स्थान आहे.

गौराई मातेलादेखील या फुलांची आरास केली जाते. तालुक्यातील सडे, माळरान सोनुकलीच्या फुलांनी बहरले आहेत. माळरानावर जणू सोनंच पेरलं आहे असा आभास अनेकदा होतो. सोनुकलीच्या फुलांना गणेश पूजेत तितकाच आजही बहुमान आहे. पूर्वी या फुलांनी गणपतीच्या मकराची आरास केली जात होती.

तेरडा या फुललादेखील पूजेत बहुमान आहे. हा तेरडादेखील रान माळांची शोभा वाढवत आहेत, तर या फुलांनीदेखील मखराची आरास केली जात होती.

रानमाळावर फुललेल्या काही फुलांना गणेश पूजेमध्ये बहुमान नसला तरी अशी रानफुले निसर्गाच्या वैभव भर घालत आहेत. या फुलांचा हंगामा पावसाळ्यातच असतो. रहदारीच्या मार्गावर फुललेली ही फुले अनेकांचे लक्ष वेधून घेतात. मुंबई, पुणे आदी भागातील पर्यटकांनाही या फुलांचे कुतूहल वाटते.



**दापोली : दापोलीच्या रान माळावर फुललेल्या या रंगीबेरंगी रानफुलांनी नसर्गाचे रूप असे सजले आहे.**


**नवी मुंबई महानगरपालिका**

शहर अभियंता विभाग

निविदा सुचनाक्र.नमुंमपा / श.अ/179/2025-26

| अ. क्र. | कामाचे नांव | अंदाजपत्रकिय रक्कम (रू.) |
|---|---|---|
| 1 | वाशी विभागातील से.15 येथील मार्केट प्लॅाट क्र.46अ ते ओमकार सोसायटी पर्यंत गटार व पदपथ बांधणे. | रु.1,43,79,063/- |
| 2 | वाशी येथील पामबीचरोड लगत बिकानेर वाला स्वीट त सतरा प्लाझा पर्यंतच्या रस्ता दुभाजका मध्ये एफ.आर.पी. ग्रील बसविणे. | रु.42,23,857/- |

निविदा पुस्तिका ई-टेंडरिंग (E-tendering) संगणक प्रणालीच्या https://mahatender.gov.in या संकेतस्थळावर दि.08/09/2025 रोजी प्राप्त होतील. निविदेचे सादरीकरण https://mahatender.gov.in या संकेतस्थळावर Online करण्याचेआहे. ई-टेंडरिंग (E-tendering) प्रक्रियेतील कोणत्याही तांत्रिक अडचणींसाठी सदर संकेतस्थळावर दिलेल्या हेल्प डेस्क नंबर वर संपर्क करावे

कोणतीही निविदा स्विकारणे अथवा नाकारण्याचा अधिकार आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका यांनी राखुन ठेवलेला आहे..

सही/-
शहर अभियंता
नवी मुंबई महानगरपालिका

जा.क्र-नमुंमपा/जसं/जाहिरात/475/2025



PRIME FOCUS LIMITED

**प्राइम फोकस लिमिटेड**

**कॉर्पोरेट आयडेंटिटी नंबर (सीआयएन) : L92100MH1997PLC108981**
**नोंदणीकृत कार्यालय :** प्राइम फोकस हाऊस, सिटी बँकेसमोर, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२. **दूरध्वनी :** ०२२-२६४८ ४९००
**वेबसाइट :** www.primefocus.com **ई-मेल :** ir.india@primefocus.com

**२८ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना व परोक्ष ई-मतदान/ई-मतदानाची माहिती**

याद्वारे सूचना देण्यात येत आहे की, कंपनी कायदा, २०१३ (“**कायदा**”) च्या लागू तरतुदी व त्याअंतर्गत संस्थापित नियम तसेच भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ (“**सूची विनियमन**”) सहवाचन कॉर्पोरेट कामकाज मंत्रालयाद्वारे जारी परिपत्रके दि. ०८.०४.२०२०, १३.०४.२०२० सहवाचन यासंदर्भात जारी अन्य परिपत्रके, नवीनतन परिपत्रक दि. १९.०९.२०२४ (“**एमसीए परिपत्रके**”) तसेच सूची विनियमनांच्या विशिष्ट तरतुदींच्या अनुपालनाशी संबंधित अतिरिक्त शिथिलतांसंदर्भात भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळाद्वारे जारी सेबी परिपत्रक क्र. सेबी/एचओ/सीएफडी/सीएफडी-पीओडी-२/पी/सीआयआर/२०२४/१३३, दि. ०३.१०.२०२४ (**सेबी परिपत्रके**) यांच्या अनुपालनांतर्गत एजीएमची सूचना दि. १३.०८.२०२५ (“**सूचना**”) मध्ये विहित केल्यानुसार विषयांवर विचारविनिमय करण्यासाठी प्राइम फोकस लिमिटेड (“**कंपनी**”) च्या सभासदांची २८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. ३०.०९.२०२५ रोजी दु. १२.३० वा. (भा. प्र. वे.) व्हिडीओ कॉन्फरन्सिंग (“**व्हीसी**”) वा अदर ऑडिओ व्हीज्युअल मीन्स (“**ओएव्हीएम**”) यांच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत आहे. सदर सूचना कंपनीची वेबसाइट www.primefocus.com वर तसेच सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड (सीडीएसएल)ची वेबसाइट www.evotingindia.com, बीएसई लिमिटेडची वेबसाइट www.bseindia.com वर तसेच नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com वर उपलब्ध आहे. व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सभेस उपस्थित राहणारे सभासद कायद्याचे अनुच्छेद १०३ अंतर्गत कोरमकरिता गणले जातील. एजीएमकरिताचे अपेक्षित ठिकाण हे कंपनीचे नोंदणीकृत कार्यालय अर्थात प्राइम फोकस हाऊस, लिंकिंग रोड, सिटी बँकेसमोर, खार (पश्चिम), मुंबई - ४०० ०५२ हे समजण्यात यावे.

वरील परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत ज्या भागधारकांचे ई-मेल पत्ते कंपनी/कंपनीचे रजिस्ट्रार व शेअर ट्रान्सफर एजंट-एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वीची लिंक इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ज्ञात) (“**आरटीए**”) वा डिपॉझिटरीज/डिपॉझिटरी पार्टिसिपंट्स यांच्याकडे नोंदवलेले आहेत अशा सभासदांना एजीएमची सूचना तसेच वित्तीय वर्ष २०२४-२५ करिताचा कंपनीचा वार्षिक अहवाल शुक्रवार, दि. ०५.०९.२०२५ रोजी इलेक्ट्रॉनिक स्वरूपात पाठवण्यात आला आहे.

कंपन्या कायदा, २०१३ चे अनुच्छेद १०८ सहवाचन कंपन्या (व्यवस्थापन व प्रशासन) नियम, २०१४ चे नियम २० वेळोवेळी सुधारित केल्यानुसार, सेबी (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन, २०१५ चे विनियमन ४४ व सर्वसाधारण सभांवरील सचिवालयीन निकष २ यांच्या अनुपालनांतर्गत **मंगळवार, दि. २३.०९.२०२५ (निर्धारित अंतिम तारीख)** रोजीनुसार कागदोपत्री वा डीमॅट स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांना सीडीएसएलद्वारे पुरविण्यात आलेल्या इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून ए) परोक्ष ई-मतदान व बी) एजीएमदरम्यान ई-मतदान यांच्या माध्यमातून एजीएमच्या सूचनेत विहित सर्व ठरावांवर आपली मते देता येतील व अशा ई-मतदानाद्वारे सदर विषयांवर विचारविनिमय करता येईल.

परोक्ष ई-मतदान कालावधी (अर्थात सभेच्या ठिकाणाव्यतिरिक्त अन्य ठिकाणाहून इलेक्ट्रॉनिक मतदान प्रणालीचा वापर करून मतदान) **शुक्रवार, दि. २६.०९.२०२५ रोजी (स. ९.०० वा. भा. प्र. वे.) सुरू होईल** व **सोमवार, दि. २९.०९.२०२५ रोजी सायं.५.०० वा. (भा. प्र. वे.)** संपेल. सदर कालावधीदरम्यान सभासद त्यांची मते इलेक्ट्रॉनिक स्वरूपात देऊ शकतील. **सोमवार, दि. २९.०९.२०२५ रोजी सायं.५.०० वा.** पश्चात सीडीएसएलद्वारे परोक्ष ई-मतदानाचे मोड्युल अकार्यरत करण्यात येईल. निर्धारित अंतिम तारखेनुसार कागदोपत्री स्वरूपातील वा डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील भागधारक असलेल्या सभासदांना केवळ परोक्ष ई-मतदान सुविधा किंवा एजीएममध्ये ई-मतदान सुविधा, जी बाब लागू असेल त्यानुसार, प्राप्त करता येईल. निर्धारित अंतिम तारखेस सभासद नसलेल्या व्यक्तींनी सदर सूचना केवळ माहितीसाठी समजावी. सभासदाद्वारे ठरावावर एकदा मत दिल्यानंतर पुढे त्याला ते बदलता येणार नाही किंवा पुन्हा मत देता येणार नाही.

सभेस उपस्थित असलेल्या ज्या सभासदांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले नसेल ते एजीएममध्ये सीडीएसएलच्या ई-मतदान पोर्टलवर लॉग इन करून आपला मतदानाचा हक्क बजावू शकतील. एजीएमच्या आधी परोक्ष ई-मतदानाद्वारे आपले मत दिलेले सभासदही एजीएममध्ये व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून सहभाग घेऊ शकतील, परंतु त्यांना एजीएममध्ये पुन्हा मत देता येणार नाही. ठरावावर एकदा मत दिल्यानंतर व निश्चित केल्यानंतर सभासदास नंतर ते बदलता येणार नाही.

एखाद्या व्यक्तीने सूचनेच्या पाठवणीपश्चात कंपनीचे शेअर्स संपादित केले असतील व कंपनीची सभासद बनली असेल व निर्धारित अंतिम तारखेस भागधारक असल्यास सदर व्यक्तीने मत देण्यासाठी लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करण्यासाठी स्वीकृत करावयाच्या प्रक्रियेकरिता कृपया सूचना वाचावी तसेच helpdesk.evoting@cdslindia.com येथे विनंती पाठवून लॉग इन आयडी व पासवर्ड प्राप्त करू शकेल. तथापि, जर सदर व्यक्ती यापूर्वीच परोक्ष ई-मतदानाकरिता सीडीएसएलकडे नोंदणीकृत असल्यास सदर व्यक्ती मत देण्यासाठी विद्यमान युजर आयडी व पासवर्डचा वापर करू शकेल. तुम्ही पासवर्ड विसरला असल्यास www.evotingindia.com वरील Forget User Details/Password या पर्यायाचा वापर करून तो रिसेट करू शकाल.

डीमटेरियलाइज्ड् स्वरूपातील, कागदोपत्री स्वरूपातील भागधारक असलेल्या तसेच ई-मेल पत्ते नोंदवलेले नसलेल्या सभासदांकरिता परोक्ष ईमतदान तसेच एजीएममध्ये मतदानाचे स्वरूप एजीएम आयोजित करणाऱ्या सूचनेत परोक्ष ई-मतदान वा एजीएमदरम्यान ई-मतदानाकरिताच्या विस्तृत निर्देशांसमवेतदिलेले आहे. जे सभासद व्हीसी/ओएव्हीएम सुविधेच्या माध्यमातून एजीएममध्ये उपस्थित असतील व ज्यांनी परोक्ष ई-मतदानाद्वारे ठरावावर आपले मत दिलेले नसतील त्यांना, मत देण्यास प्रतिबंध केलेला नसल्यास असे सभासद अध्यक्षांद्वारे घोषणेपश्चात आयोजित करण्यात येत असलेल्या ठरावांच्या चर्चेच्या समाप्तीच्या वेळी एजीएमदरम्यान ई-मतदान प्रणालीद्वारे अशा ठरावांवर मत देण्यास पात्र असतील. व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून एजीएममध्ये उपस्थित राहण्याकरिताचे निर्देश एजीएमच्या सूचनेतही दिलेले आहेत.

परोक्ष ई-मतदानासंदर्भात काही प्रश्न/शंका असल्यास तुम्ही www.evotingindia.com वरील e-voting manual पाहू शकता किंवा खालील ठिकाणी संपर्क साधू शकता :

**नाव व पद :** श्री. राकेश दळवी, उप व्यवस्थापक
**पत्ता :** सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, मॅरेथॉन फ्युच्युरेक्स, ए विंग, २५ वा मजला, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - ४०० ०१३.
**ई-मेल आयडी :** helpdesk.evoting@cdslindia.com
**दूरध्वनी क्र. :** १८००-२२-५५३३.

ई- मतदान प्रक्रिया नि:पक्ष व पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी कंपनीने श्री. मेहूल रावल, कार्यरत कंपनी सचिव (सदस्यत्व क्र. एसीएस १८३००, सीओपी नं. २४१७०) यांची परीनिरीक्षक म्हणून नेमणूक केली आहे.

सभेमध्ये उपस्थित राहून मत देण्यास पात्र सभासद त्याच्या ऐवजी उपस्थित राहून मत देण्यासाठी प्रतिनिधीची नेमणूक करू शकतो. असे प्रतिनिधी हे कंपनीचे सभासद असण्याची आवश्यकता नाही. अर्थात एमसीए परिपत्रकांच्या अनुपालनांतर्गत सदर एजीएम ही व्हीसी/ओएव्हीएमच्या माध्यमातून आयोजित करण्यात येत असल्याने सभासदांची प्रत्यक्ष उपस्थिती आवश्यक नाही. त्यामुळे सभासदांद्वारे प्रतिनिधीची नेमणूक करण्यासाठीची सुविधा एजीएमकरिता उपलब्ध नसेल व त्यामुळे सदर सूचनेसमवेत प्रतिनिधित्व फॉर्म व उपस्थिती पत्र जोडलेले नाही.

**संचालक मंडळाच्या आदेशाद्वारे**
**प्राइम फोकस लिमिटेड करिता**
**सही/-**
**परिना शाह**
**कंपनी सचिव व अनुपालन अधिकारी**

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : ०७.०९.२०२५**